**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन — सैनिक कल्याण विभाग**
**छात्रपुर्व प्रशिक्षण केंद्र**
**विभागीय आयुक्त कार्यालय परिसर,नाशिक रोड, नाशिक - 422101**
**ईमेल आय डी : pctcoic@yahoo.in** **दूरध्वनी क्र. : 0253-2451032**

2551//प्र.नि./छाप्रके-3 दिनांक : 08 मे 2023

प्रति,

जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी
जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय
सर्व जिल्हे **(ई-मेलव्दारे)**

**विषय : छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक येथे चालणाऱ्या एस.एस.बी प्रशिक्षण वर्ग क्र. 53 ची प्रसिध्दी करणेबाबत**

संदर्भ : विभागाचे पत्र क्र. 19008/सैकवि-19 दिनांक 16 एप्रिल 2010 आणि मा. संचालक, सैकवि, पुणे यांचे अर्धशासकीय पत्र क्र. 19008/सैकवि-19 दिनांक 28 डिसेंबर 2010.

1. उपरोक्त विषय आणि संदर्भीय पत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक येथे महाराष्ट्रीयन नवयुवक व नवयुवतीं साठी SSB कोर्स क्र. 53 चालविण्यासाठी मा. संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांची मंजुरी मिळाली असुन केंद्रामध्ये तसे आयोजन करण्यात आले आहे. त्याचा तपशिल खालील नमूद प्रमाणे आहे :-

| **अ. क्र.** | **तपशिल** | **कालावधी/दिनांक** | **शेरा** |
|---|---|---|---|
| 1. | कोर्सचे नांव व क्रमांक | **SSB** कोर्स क्र. 53 | |
| 2. | कोर्स कालावधी | **दिनांक 29 मे 2023 ते 07 जून 2023** | |
| 3. | निवड केलेल्या प्रशिक्षणार्थीची यादी **E-Mail** व्दारे केंद्रास पोहचण्याची अंतिम तारीख | **दिनांक 24 मे 2023** | |

जिल्हयास दिलेल्या प्रशिक्षणार्थी निवडीच्या उदिष्टाबाबत विभागाच्या संदर्भीय पत्रांमध्ये दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी ही विनंती.

---- 2 /-

2. निवड केलेल्या प्रशिक्षणार्थींना त्यांनी सोबत आणलेले प्रवेश पत्राची पडताळणी आणि प्रतिस्वाक्षरी करुन देण्यात यावे व केंद्रामध्ये येताना सोबत इयत्ता **दहावी** ते पदवी पर्यंतची सर्व मुळ प्रमाणपत्रे सोबत घेऊन येणेबाबत त्यांना अवगत करण्यात यावे. मुळ प्रमाणपत्रे कोर्सच्या कालावधीमध्ये सुरक्षा जमानत म्हणून केंद्रात ठेवण्यात येतील. तसेच प्रशिक्षणार्थी जिल्हयामध्ये मुलाखतीस येते वेळी त्यांनी Facebook पेज वर **Department of Sainik Welfare, Pune (DSW) वरील** उपलब्ध प्रिंट काढून आणलेल्या **(किंवा संबंधीत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने प्रिंट देणे) प्रवेशपत्राची** आणि **परिशिष्टांची Check List** आणि महत्वाच्या **तारखां नुसार** तपासणी करण्यात यावी. निवड केलेल्या प्रशिक्षणार्थींना दिनांक 28 मे 2023 रोजी **सकाळी** 10.00 वाजता छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, विभागीय आयुक्त कार्यालय आवार, वर्ग-2 अधिकारी निवासस्थाने, नाशिक रोड, नाशिक येथे हजर होणे बाबत अवगत करण्यात यावे.

3. निवड केलेल्या प्रशिक्षणार्थींची यादी **(PDF File)** मध्ये दिनांक 24 मे 2023 पर्यंत ई-मेल व्दारे केंद्रास पाठविण्याची व्यवस्था करण्यात यावी ही विनंती .

4. सोबत जिल्हयाने प्रसिध्दीस द्यावयाचे बातमीपत्र व प्रसिध्दीस द्यावयाच्या बातमीपत्राच्या कार्यवाहीची निर्धारीत कार्यपध्दती जोडण्यात येत आहे.

ले.कर्नल सोनवणे विलास शंकर (नि.)
प्रभारी अधिकारी
छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र,
नाशिक रोड, नाशिक

<u>सोबत</u> : वरीलप्रमाणे.

प्रति,

मा. संचालक
सैनिक कल्याण विभाग (महाराष्ट्र राज्य)
रायगड इमारत, राष्ट्रीय युध्द स्मारकासमोर
सोलापूर रोड, घोरपडी, पुणे - 411 001

- मानियांचे माहितीस्तव सविनय सादर. तसेच **विभागाच्या** Facebook/**वेब साईटवर** पेज वर **Department of Sainik Welfare, Pune (DSW) वर उपलब्ध करण्याची विनंती करण्यत येत आहे.**